पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती**

कार्यपत्रिका क्रमांक – ४

**सभावृत्तांत**

दिनांक - **२१/१२/२०१६** वेळ - दुपारी **२.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक **२१/१२/२०१६** रोजी दुपारी **२.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.मासुळकर समीर मोरेश्वर - सभापती**
**२.** मा.ननवरे जितेंद्र बाबा
**३.** मा.तानाजी विठ्ठल खाडे
**४.** मा.बो-हाडे अरुण तुकाराम

या शिवाय मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.कदम – प्रशासन अधिकारी, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्य यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.१) महापौर चषक जिल्हास्तर शालेय खो-खो स्पर्धा २०१६-१७ आयोजित करणेबाबत – मा.अरुण बो-हाडे, मा.तानाजी खाडे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.२) महापौर चषक राज्यस्तर व्हॉलीबॉल (पासिंग) स्पर्धा २०१६-१७ आयोजित करणेबाबत - मा.अरुण बो-हाडे, मा.तानाजी खाडे यांचा प्रस्ताव.

----------

दिनांक **०२/११/२०१६, १६/११/२०१६ व ०७/१२/२०१६** रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्र.३ )** सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

**सभाकामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक – ११ विषय क्रमांक - १
दिनांक - २१/१२/२०१६
सुचक : मा.अरुण बो-हाडे अनुमोदक : मा.तानाजी खाडे
संदर्भ : मा.अरुण बो-हाडे, मा.तानाजी खाडे यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्यावतीने, पुणे जिल्हा खो-खो असोशिएशन यांच्या मान्यतेने पुणे जिल्हा उत्तर विभाग मित्रमंडळ यांच्या सहकार्याने प्रभाग क्र.३३ ( इ क्षेत्रीय कार्यालय ) स.नं.२०० आरक्षण क्र.४०७ गवळीनगर, पुणे – ४११ ०३९ येथे माहे डिसेंबर २०१६ मध्ये महापौर चषक जिल्हास्तर शालेय खो-खो स्पर्धा २०१६-१७ (वयोगट – १७ ते १९ वर्ष मुले/मुली) आयोजित करणेस व त्याकामी येणा-या र.रु.१०,०३,४२०/- (अक्षरी र.रु.दहा लाख, तीन हजार, चारशे वीस फक्त) चे खर्चास मान्यता व सदर स्पर्धा अनुषंगाने ट्रॉफीज व सन्मानचिन्हे, मेडल्स खरेदी, पी.व्ही.सी.फ्लेक्स, बॅनर छपाई क्रीडा साहित्य खरेदी, प्रमाणपत्र, निमंत्रण पत्रिका छपाई ई कोटेशन नोटीस प्रसिध्द करुन करणेस व स्पर्धा अनुषंगाने मैदान तयार करणे व स्टेज मंडप, टेबल खुर्च्या, गॅलरी व्यवस्था खर्च र.रु.४,००,०००/- हा स्थापत्य विभाग संबंधित क्षेत्रीय कार्यालय व विद्युत स्पिकर व माईक, जनरेटर व्यवस्था खर्च र.रु.१,००,०००/- हा विद्युत विभाग संबंधित क्षेत्रीय कार्यालय यांचे लेखाशिर्षातून खर्ची टाकणेस व उर्वरित स्पर्धा खर्च र.रु.५,०३,४२०/- हा खर्च क्रीडा विभागाचे "महापौर चषक विविध क्रीडा स्पर्धा" या लेखाशिर्षातून खर्ची टाकणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – १२ विषय क्रमांक - २
दिनांक - २१/१२/२०१६
सुचक : मा.अरुण बो-हाडे अनुमोदक : मा.तानाजी खाडे
संदर्भ : मा.अरुण बो-हाडे, मा.तानाजी खाडे यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्यावतीने, महाराष्ट्र राज्य व्हॉलीबॉल (पासिंग) असोशिएशन पुणे जिल्हा व्हॉलीबॉल (पासिंग) असोशिएशन यांच्या मान्यतेने व श्री वाघेश्वर व्हॉलीबॉल संघ, यांच्या सहकार्याने प्रभाग क्र.३ ( इ क्षेत्रीय कार्यालय ) काळजेवाडी रोड, कोतवालवाडी चौक, महापालिका आरक्षित खेळाचे मैदान, च-होली बु//, ता.हवेली, जिल्हा - पुणे – ४१२ १०५ येथे माहे डिसेंबर २०१६ मध्ये महापौर चषक राज्यस्तर व्हॉलीबॉल (पासिंग) स्पर्धा २०१६-१७ आयोजित करणेस व त्याकामी येणा-या र.रु.१८,२१,८००/- (अक्षरी र.रु.अठरा लाख, एकवीस हजार, आठशे फक्त) चे खर्चास मान्यता व सदर स्पर्धा अनुषंगाने ट्रॉफीज व सन्मानचिन्हे, मेडल्स खरेदी, पी.व्ही.सी.फ्लेक्स, बॅनर छपाई क्रीडा साहित्य खरेदी, प्रमाणपत्र, निमंत्रण पत्रिका छपाई ई कोटेशन नोटीस प्रसिध्द करुन करणेस व स्पर्धा अनुषंगाने मैदान तयार करणे व स्टेज मंडप, टेबल खुर्च्या, गॅलरी व्यवस्था, पुणे शहरा बाहेरील ३० संघ (४५० खेळाडू) करीता गाद्या, उशा, चादरी, बेडशीट, बादली, मग भाडे खर्च र.रु.६,०२,५००/- हा स्थापत्य विभाग संबंधित क्षेत्रीय कार्यालय व विद्युत

स्पिकर व माईक, जनरेटर व्यवस्था खर्च र.रु.१,५०,०००/- हा विद्युत विभाग संबंधित क्षेत्रीय कार्यालय यांचे लेखाशिर्षातून खर्ची टाकणेस व उर्वरित स्पर्धा खर्च र.रु.१०,६९,३००/- हा खर्च क्रीडा विभागाचे “महापौर चषक विविध क्रीडा स्पर्धा” या लेखाशिर्षातून खर्ची टाकणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

( **मासुळकर समीर मोरेश्वर** )
**सभापती**
मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/८३३/२०१६
दिनांक : २३/१२/२०१६



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

Z\e drive\Nagarsachiv1\New Folder\Eile 17 sub committee sabhapati.doc